प्रेस नोट

दिनांक - २२/१०/२०२६

राष्ट्रीय एकता दिवस - २०२६ निमित्त "नशामुक्त भारत" या संकल्पनेवर आधारित जनजागरणपर मोटर सायकल रॅलीचा शुभारंभ मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्या शुभ हस्ते संपन्न होणार आहे.

भारताचे पहिले उपपंतप्रधान व तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री, भारताच्या एकात्मतेचे शिल्पकार लोहपुरुष मा. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर हा दिवस -राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरा करण्यात येतो. देशाची एकता, अखंडता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी मा. सरदार वल्लभभाई पटेल यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाचे स्मरण करणे तसेच देशातील विविधतेतून एकता आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ करणे, हा या दिनाच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे.

राष्ट्रीय एकता दिन, २०२६ अनुषंगाने केंद्र शासन गृह मंत्रालयाच्या निर्देशानुसार दि. ३१/१०/२०२६ रोजी गुजरात राज्यातील एकतानगर, केवडिया येथील - स्टॅच्यू ऑफ युनिटी परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर देशभरातील राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या पोलीस दलांचा तसेच केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या मोटारसायकलस्वार पथकांचा सहभाग असलेली **-राष्ट्रीय मोटारसायकल रॅली** (National Motorcycle Rally) आयोजित करण्यात आली आहे. या रॅलीच्या माध्यमातून - **नशामुक्त भारत** (DRUGS FREE INDIA) हा संदेश प्रसारित करून अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू आहे.

दक्षिण भारतातील विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील पोलीस दलांची ११ पथके प्रत्येक राज्याचे ५ मोटरसायकलस्वार दिनांक २३/१०/२०२६ रोजी मुंबई, महाराष्ट्र येथे एकत्रित होणार आहेत. या रॅलीमध्ये महाराष्ट्र पोलीस दलाच्या पथकाचाही सहभाग असणार आहे. विविध राज्यांतील पोलीस दलांचा सहभाग असलेली ही रॅली राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि अमली पदार्थमुक्त भारताचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रमुख उपस्थिती मध्ये राष्ट्रीय मोटारसायकल रॅलीचा **शुभारंभ सोहळा शनिवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ०९.३० वाजता, मरीन ड्राइव्ह, (हॉटेल ट्रायडंट समोर), मुंबई येथे** आयोजित करण्यात आला आहे.

सदर समारंभ प्रसंगी मा. ना. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.ना. पालकमंत्री, मुंबई, मा. ना. महापौर, मुंबई, मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, पोलीस आयुक्त मुंबई शहर तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

भारतातील विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील पोलीस दलांची ११ पथके मुंबई, महाराष्ट्र येथून दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ रोजी गुजरातमधील एकतानगर, केवडिया येथे होणाऱ्या राष्ट्रीय एकता दिनाच्या कार्यक्रमासाठी मार्गस्थ होतील. या रॅलीचा प्रमुख उद्देश राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे तसेच अमली पदार्थांच्या सेवन व दुष्परिणामांबाबत जनजागृती करून **नशामुक्त भारत** हा संदेश जनमानसात पोहोचविणे हा आहे.

---------- *----------

Scanned with CamScanner